## Savitribai Phule Pune University, Pune.

## Brihan Maharashtra College of Commerce, Pune-04.

### Board of Students' Development

### निर्भय कन्या अभियान 2018-19

**अहवाल**

महाविद्यालयाने विद्यार्थी विकास मंडळातर्फे निर्भय कन्या अभियान या योजनेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्याकडे प्रस्ताव पाठवला होता. विद्यापीठाने या प्रस्तावास मान्यता दिली. या योजनेंतर्गत महाविद्यलयामध्ये ३ व्याख्याने आयोजित केली होती. ती खालीलप्रमाणे-

## १. स्वसंरक्षण-

दिनांक ९/०१/२०१९ रोजी बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयामध्ये विद्यार्थी विकास मंडळातर्फे निर्भय कन्या अभियान उपक्रमाअंतर्गत विद्यार्थिनींना स्व-संरक्षण या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या स्वसंरक्षण व्याख्यानाचा उद्देश विद्यार्थिनी समाजामध्ये आपल्या दैनंदिन कार्य करत असताना त्यांना जर काही वाईट प्रवृत्तींनी त्रास देण्याचा प्रयत्न झाला तर त्यास त्यांनी प्रतिकार करून स्वसंरक्षण करावे हा होता.

प्रियंका काळे आणि पल्लवी शेंडगे यांचे या कार्यशाळेमध्ये विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाची गरज या विषयावर व्याख्यान झाले. या प्रसंगी बोलताना प्रियंका काळे यांनी स्वसंरक्षणाची आवश्यकता सांगितली. जर आपण स्वसंरक्षनाचे धडे घेतले तर आपला आत्मविश्वास वाढतो व जर एखादे संकट आले तर आपण त्या संकटास धैर्याने सामोरे

जाऊ शकतो. यापारसंगी त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थीनीना विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे देखील देण्यात आले.
या कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी डॉ. आशिष पुराणिक, डॉ. राजेश कुचेकर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संयोजन प्रा. प्रिती राजगुरू यांनी केले.

## २. महिलांविषयक कायदे-

विद्यार्थी विकास मंडळामार्फत निर्भय कन्या योजनेंतर्गत बृहन्महराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयामध्ये दिनांक १ फेब्रुवारी २०१९ रोजी महिला विषयक कायदे या विषयावर ॲड. प्रतिभा जोशी दलाल यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी ॲड. दलाल यांनी महिलांविषयक असणारे विविध कायदे त्यांचे उपयोग याप्रसंगी त्यानी व्यक्त केले. महिलांचे मालमत्ता विषयक असणारे अधिकार हे महिलांना माहिती नसतात त्यामुळे महिलांना अनेक समस्याना तोंड द्यावे लागते. त्यामुळे हे अधिकार महिलांना माहिती असणे आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले.

तसेच या प्रसंगी त्यांनी महिलांचे इतर अधिकार व त्यासबंधी कायदे या विषयी विद्यार्थिनिना मार्गदर्शन केले. महिलांनी केवळ आपल्या अधिकारावरच केंद्रीत न होता जबाबदारीचे भान देखिल ठेवणे गरजेचे आहे असे त्यांनी यावेळी सांगितले.

समाजामध्ये कही ठिकाणी महिलांना असणाऱ्या कायद्यांचा गैरवापर महिलांकडून काही प्रमाणात केला जातो. असा गैरवापर देशाचे सुजान नागरिक म्हणून आपण असा गैरवापर आपनाकडून होणार नाहीं तसेच इतरांकडूनही होणार नाही याची जबाबदारी आपण घेतली पाहिजे. असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ए. एम. पुराणिक, प्रा.डॉ. भोसले, प्रा. साळुंखे, प्रा. महानुर हे देखिल उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थीनी श्वेता दौंडे हिने केले. तसेच पाहून्यांची किरण तरटे याने केली. तर आभारप्रदर्शन हर्षदा कांबळे हिने केले.

## ३. विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास-

बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यायामध्ये शुक्रवार दि. ८ मार्च,२०१९ रोजी जागतिक महिलादिनाचे औचित्य साधूननिर्भय कन्या अभियान अंतर्गत महाविद्यालयामध्ये विद्यार्थी विकास मंडळाच्या अंतर्गत विद्यार्थिनिसाठी 'व्यक्तिमत्व विकास' हा विषयावर व्याख्यान क आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सौ. अनुपमा देशमुख ह्या होत्या.

याप्रसंगी बोलताना सौ. अनुपमा देशमुख यांनी समाजामध्ये वावरत असताना व्यक्तिमत्व किती महत्वाचे आहे किंवा व्यक्तिमहत्वाचा प्रभाव किती महत्वाचा आहे याविषयी मार्गदर्शन केले. तसेच व्यक्तिमत्वामध्ये बदल झाल्याने समाजामध्ये अशा व्यक्तीना आत्मविश्वासाने वावरता येते. विविध क्षेत्रामध्ये काम करत असताना अशा आत्मविश्वासाचा आपणास कसा फायदा होतो हे देखिल त्यांनी या प्रसंगी सांगितले. विद्यार्थिनिनी समाजामध्ये निर्भिडपने वावरन्यासाठी कोणत्या गोष्टी आत्मसात कराव्यात या विषयी त्यांनी विशेष मार्गदर्शन केले. डॉ. कुचेकर सर यांच्या हस्ते पाहून्यांचे सत्कार करण्यात आले. तसेच कार्यक्रमाला सौ. राजगुरु मॅडम सुद्धा उपस्थित होत्या. तसेच कार्यक्रमाला १२७ विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैदेही गावंडे हिने केले. तसेच पाहुन्यांची ओळख स्नेहा शेंडकर हिने करून दिली.  तर आभारप्रदर्शन गीता वडेकर हिने केले.

डॉ. राजेश कुचेकर

(विद्यार्थी विकास अधिकारी)

19031306

वि.वि.मं.नोंदणी क्रमांक :- PC09

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## विद्यार्थी विकास मंडळ
## महाविद्यालयाचा संक्षिप्त अहवाल

दिनांक : 16/03/2019

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आयोजक महाविद्यालय/संस्थेचे नाव | : | डेक्कन एज्युकेशन सोसायटी बी एम कॉलेज ऑफ कॉमर्स पत्ता: ८४५ शिवाजीनगर डेककन जिमखाना ता.: पुणे (महानगर पालिका हद्द) जि: पुणे पिनकोड: 411004 | | | | | |
| मा. प्राचार्य/संचालक नाव | : | डॉ रावळ चंद्रकांत एन | | | | | |
| विद्यार्थी विकास अधिकारी नाव | : | कुचेकर राजेश पांडुरंग | | | | | |
| गट | : | ब | | | | | |
| योजना/उपक्रम/कार्यशाळेचे/नाव | : | Nirbhay Kanya Abhiyan | | | | | |
| योजना/उपक्रम/कार्यशाळेचे/कालावधी | : | 3 | | | | | |
| सहभागी विद्यार्थी संख्या | : | मुले | 0 | मुली | 652 | एकूण | 652 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सदर उपक्रमाची विद्यार्थी विकासासाठी उपयोगिता | : | उत्कृष्ट | चांगली | बरी | वाईट |
| | | 600 | 30 | 22 | 0 |
| सदर उपक्रमाला कालावधी पुरेसा होता काय ? | : | होय | 640 | नाही | 12 |
| सदर उपक्रमाला नियोजन सुयोग्य होते काय? | : | होय | 645 | नाही | 7 |






विद्यार्थी विकास अधिकारी,
स्वाक्षरी व शिक्का

प्राचार्य
स्वाक्षरी व शिक्का